# कार्यालय तालुका आरोग्य अधिकारी
# तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद

## कंत्राटी पध्दतीने खालील नमूद पदांकरीता अर्ज मागवीण्यात येत आहे

राष्ट्रीय नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद अंतर्गत तालुकास्तर ठिकाणी ११ महिन्या करिता कंत्राटी तत्वावर पदे भरावयाचे आहे. व सदरील जाहिरात ची सविस्तर माहिती अर्जाचा नमुना व अटी व शर्ती http://www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेली आहे यानुसार खालील पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी पदासमोर दर्शविलेल्या ठिकाणी आपले अर्ज जाहीरात दिनांकः ०३/१०/२०२२ दिनांकापासून ते दिनांक १३/१०/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन खाली नमुद केलेल्या नमुन्यामध्ये व्यक्तीशः सादर करावेत. उशीरा प्राप्त झालेल्या (प्रत्यक्ष/पोस्टाद्वारे) अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

| अक्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे व आरक्षण | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी – अर्धवेळ | MBBS | Open-1<br>Total-1 | ३०,०००/- |
| २ | स्टाफ नर्स | १) महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलची मान्यता असलेल्या संस्थेचा GNM/B.SC Nursing कोर्स पूर्ण<br>२) MSCIT | SC-1<br>Open-1<br>Total-2<br>Only females | २०,०००/- |
| ३ | लॅब टॅनिश्यिन | 1) B.Sc<br>2) DMLT | Open-1<br>Total-1 | १७,०००/- |

**-स्वाक्षरीत-**
**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**तालुका आरोग्य अधिकारी,**
**तालुका सिल्लोड**

## ***अटी व शर्ती :-***

१) सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन अकरा महिन्यांची कालावधी करिता नेमणुक दिली जाईल. तसेच केद्र शासनाने संबधित पद नामंजूर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

३) वरील तक्त्यातील सर्व पदाकरीता निवड प्रक्रीया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छानननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन प्रत्येक्ष मुलाखती / कौशल्य चाचणी घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती http://www.aurangabadzp.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांशी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.

४) अर्जदाराने एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करायचा असल्यास स्वतंत्र अर्ज करावा व अर्जासोबत जोडण्यात आलेल्या (डि.डी.) धनाकर्षाची रक्कम परत केली जाणार नाही. या अटीवर उमेदवाराने अर्ज करावा.

५) **अर्जदाराने अर्ज A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अतंर्भुत असाव्यात**

१) अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे नांव, पदाचे नांव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, Email id, जन्मतारीख, शैक्षणीक अर्हतेचे सर्व तपशील - अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विद्यापीठाचे नांव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव - काम केलेल्या शासकीय / निमशासकीय संस्था/रुग्णालयाचे नांव, ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नांव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२) अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले एस.एस.सी., एच.एस.सी.गुणपत्रीका व प्रमाणपत्र, शाळेचा दाखला, पदवी गुणपत्रीका व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गुणपत्रीका व प्रमाणपत्र, आधार कार्ड/मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आकाराचे १ फोटो, जातीचे प्रमाणपत्र/जात वैद्यता प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

३) विशेषतज्ञांनी व इतर तात्रीक पदावरील अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबधीत कौन्सिल कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र व अद्यावत पुर्ननोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) याप्रमाणे अर्जासोबत सर्व सत्यप्रती जोडून तक्त्यामध्ये नमुद असलेल्या पदाच्या नावा समोरील नमुद कार्यालयाच्या ठिकाणी मा.अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.औरंगाबाद यांचे नावाने सादर करावा.

६) सदर पदे करार पध्दतीने भरावयाचे असल्याने एकत्रित वेतनाशिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही. तसेच लेखी परीक्षा/मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता मिळणार नाही.

७) ज्या उमेदवारांनी या अगोदार कोणत्याही पदा करीता अर्ज सादर केलेले असतील, तर ते सर्व अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी, नव्याने अर्ज करणे बंधनकारक राहील.

८) स्टाफ नर्स या पदाकरीता पुरुष उमेदवारांनी अर्ज करु नये अर्ज केल्यास संबधिताचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

९) शासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१०)सदर रिक्त पदांच्या संख्येत व मानधनात तसेच पदस्थापनेच्या ठिकाणी बदल होऊ शकतो.

११)**वयो मर्यादाः-** जाहीरातीच्या दिवशी वैद्यकिय व विशेषतज्ञ या पदाकरीता कमाल वयोमर्यादा व सेवा समाप्तीचे वय ७० वर्ष राहील. नर्सिंग व पॅरामेडीकल स्टाफ पदाकरीता कमाल वय व सेवा समाप्ती ६५ वर्ष राहील. तसेच शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल. तसेच इतर पदांकरीता खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष कमाल वर्यामर्यादा राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये कार्यरत असल्यास ५ वर्ष वयाची अट शिथिल राहील.

१२)अर्जासोबत खुल्या प्रवर्गासाठी रु.१५०/- व मागास प्रवर्गासाठी रु.१००/- चा **SILLOD THO-NUHM** या नावे देय असलेला धनाकर्ष (डि.डी.) जोडणे बंधनकारक आहे. जोडण्यात आलेल्या (डि.डी.) धनाकर्षाची रक्कम परत केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच धनाकर्ष (डि.डी.)च्या मागे स्वताःचे नांव लिहावे, चुकीच्या नावे व चुकीच्या रक्कम धनाकर्ष (डि.डी.) असल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल.

१३)उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी किंवा राजकीय दबाव आाणल्यास त्यांच्या मुलाखती किंवा नियुक्ती रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१४)**सदर भरती प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शिकपणे पार पाडण्यात येणार आहे. भरती प्रक्रिये दरम्यान काही अनधिकृत व्यक्तीकडून आपले राजकीय संबंध आहेत तसेच अधिकाऱ्यां सोबत ओळखी आहेत आणि आपण नोकरी लावून देवू असे सांगून आपल्याकडून पैसे घेवून उमेदवारांची फसवणूक होण्याची शक्यता असते. तेव्हा अशा प्रकारे नोकरी लावून देण्याकरीता कोणाकडून पैशांची मागणी झाल्यास तात्काळ अध्यक्ष तालुका निवड समिती तथा तालुका आरोग्य अधिकारी तालुका सिल्लोड यांना कळवावे.**

१५) सदरील पदभरती प्रक्रीयेचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती यांनी राखुन ठेवलेले आहे.

**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**तालुका आरोग्य अधिकारी,**
**तालुका सिल्लोड**

# कार्यालय तालुका आरोग्य अधिकारी
# तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद

## अर्जाचा नमुना

उमेदवाराचा
फोटो येथे
चिटकवावा

**प्रति,**

.........................................................

..........................................................

...........................................................

अर्ज केलेल्या पदाचे नांव : ______________________________

अर्ज सादर करावयाचे ठिकाण :______________________________
(जाहीरातीत नमुद केलेले)

अर्जदाराचे नांव : ______________________________

जातीचा प्रवर्ग : ______________ जात : ______________

अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :

______________________________________________________________

दूरध्वनी क्रमांक : ______________ Email id -----------------------------------------------------------------------

जन्म तारीख ______________ (जाहिरात प्रसिध्द तारखेस वय) : वर्ष________ महिना______दिवस________

यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्याचा अनुभव आहे काय. होय/नाही

असल्यास ठिकाण ______________________________ (वर्ष........ महिना............दिवस.......)

**शैक्षणिक माहिती :-**

| अ.क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

**इतर शैक्षणिक अर्हता** :- संगणक, टायपिंग व इतर

| अ.क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

❖ राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव व शाखा................................ धनाकर्ष क्रमांक ...................
धनाकर्ष रक्कम .................... धनाकर्ष दिनांक. .............................

दिनांक :-

ठिकाण :- उमेदवाराची स्वाक्षरी

दि: ०१/१०/२०२२

**प्रति,**
**मा.व्यवस्थापक,**
**दैनिक लोकमत / दिव्यमराठी, औरंगाबाद**

**विषय :- राष्ट्रीय नगरी प्राथमिक आरोग्य केंद्र करिता कंत्राटी पदांची जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बाबत.**

उपरोक्त विषायासंबधित जाहिरात शासकीय धोरणानुसार वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठविण्यात येत आहे. तरी कृपया सदर जाहिरात वृत्तपत्राव्दारे प्रसिध्द करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, हि विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्र | :- | तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय<br>तालुका सिल्लोड, जि. औरंगाबाद.<br>०२४३०- २२४०३० |
| २. | जाहिरातीचे स्वरुप (विभागीय किंवा -. जिल्हा पातळी) | :- | जिल्हास्तर |
| ३. | कोणत्या जिल्हयात जाहिरात संबंधित आहे. | :- | औरंगाबाद जिल्हा |
| ४. | किती वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित व्हावयाची आहे | :- | १ |
| ५. | जाहिरात प्रसिध्द होण्याची अंतिम तारीख | :- | ०३/१०/२०२२ |
| ६. | वरील वृत्तपत्रात जाहिरात किती वेळा प्रकाशित करावयाची आहे. | :- | फक्त एकच वेळ |
| ७. | जाहीरात प्रसिध्दीची भाषा | :- | मराठी. |
| ८. | कोणत्या अधिका-याकडे अथवा कार्यालयाकडे जाहिरातीचे देयक पाठवावयाचे आहे. | :- | तालुक आरोग्य अधिकारी कार्यालय,<br>तालुका सिल्लोड जि.औरंगाबाद |

**सोबत** : जाहीरातीचे प्रारुप पत्र

**टिप** : सदर जाहीरात कमीत कमी आकारामध्ये प्रकाशित करावी. (**15 X 12 CM**)

**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**तालुका आरोग्य अधिकारी,**
**तालुका सिल्लोड**

**प्रत :-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

# कार्यालय तालुका आरोग्य अधिकारी

## पंचायत समिती, सिल्लोड ता.सिल्लोड


 nqj/ouh dz- (02430) 224036

 **Email:** thosillod@gmail.com


**ज.क्र./ताआअ/पदभरती/NUHM/०१/१०२०२२/०१**
**तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय,**
**पंचायत समिती, सिल्लोड**
**दि:०१/१०/२०२२**

**प्रति,**
**मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**(आय.टी. सेल, साप्रवि विभाग)**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद.**

**विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तालुकास्तरावरील पदांची जाहिरात http://www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये **राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद करिता तालुकास्तरावरील कंत्राटी** पदे भरावयाचे आहे. त्याअनुषंगाने सदरील कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यासाठी सामाजिक आरक्षणानुसार पदाची जाहीरात http://www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन उमेदवारांना विहीत मुदतीत अर्ज सादर करणे साईचे होईल, करीता सविनय सादर.

सदरील पदभरतीची संक्षिप्त जाहिरात हे लोकप्रिय वर्तमान पत्रामध्ये आपल्यास्तरावरुन प्रसिध्द करण्यात यावे.

**सोबत** :- नागरी प्राथमिक आरोग्य केंद
तालुकास्तरावरील कंत्राटी पदाची संक्षिप्त जाहिरात.
**मा.जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेनुसार.**

**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**तालुका आरोग्य अधिकारी,**
**तालुका सिल्लोड**

**प्रत** :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.